**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**
**५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.**

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com


क्र. कोविमं/ए-२/ १२ वी गोप./प्रात्य./तोंडी/ 107
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक : १०/०१/२०२५.

प्रति,

प्राचार्य,
कोल्हापूर विभागीय मंडळ कक्षेतील,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

विषय:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च-२०२५ च्या तोंडी/
प्रात्यक्षिक/ श्रेणी परीक्षेचे साहित्य स्विकारणेबाबत.....
संदर्भ - राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-२/१२०, दिनांक ०९/०१/२०२५.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र फेब्रुवारी/मार्च-२०२५ परीक्षेच्या शास्त्र, तंत्र, व्यावसायिक आणि किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा तसेच भाषा विषयांची तोंडी परीक्षा **शुक्रवार दिनांक २४/०१/२०२५ ते सोमवार दिनांक १०/०२/२०२५** या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. तरी प्रात्यक्षिक परीक्षचे साहित्य शनिवार **दिनांक १८/०१/२०२५** रोजी **सकाळी १०.०० ते ४.००** या वेळेत वितरण केंद्रावरून वितरीत करण्यात येणार आहे. तसेच कोल्हापूर जिल्हातील कागल,पन्हाळा,गगनबावडा,कोल्हापूर शहर,करवीर व शाहूवाडी यांना शनिवार **दिनांक १८/०१/२०२५** रोजी **सकाळी १०.०० ते ४.००** या वेळेत मंडळ कार्यालयात वितरण केले जातील. तरी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील जबाबदार व्यक्तिकडे अधिकार पत्र देण्यात यावे. सदर साहित्य स्विकारल्यानंतर ते बरोबर असल्याची खात्री करावी. साहित्य कमी / जास्त असल्यास तात्काळ वितरण केंद्र प्रमुखांशी संपर्क साधण्यात यावा. त्यानंतरच वितरण केंद्र सोडावे. तद्नंतर कोणतीही तक्रार चालणार नाही. वितरण केंद्रावरून साहित्य स्विकारण्यास विलंब केल्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. तसेच प्रात्यक्षिक/तोंडी परीक्षा घेतल्यानंतर त्याचे सर्व साहित्य व गुणतक्ते वितरण केंद्रावर जमा करण्याची तारीख यथावकाश आपणास कळविण्यात येईल.

**(सुभाष रा.चौगुले),**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**प्रत माहितीसाठी :-**
१) मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग कोल्हापूर.
२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सांगली / सातारा / कोल्हापूर
प्रत माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी

मुख्याध्यापक/ प्राचार्य, जिल्हा वितरण केंद्रप्रमुख, सांगली / सातारा / कोल्हापूर

यांना कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र फेब्रुवारी/मार्च-२०२५ परीक्षेचे प्रात्यक्षिक/तोंडी परीक्षेचे साहित्य घेऊन मंडळाचे प्रतिनिधी **दिनांक १७/०१/२०२५** रोजी आपल्याकडे येणार असून सदर साहित्य **दिनांक १८.०१.२०२५** रोजी वितरीत करण्यात यावे. तसेच सदर साहित्य घेऊन न गेलेल्या कनिष्ठ महाविद्यालयास संपर्क साधून १००% साहित्य वितरीत करण्यात यावे. जे कनिष्ठ महाविद्यालया साहित्य स्विकारण्यासाठी आले नाहीत त्याची माहिती जिल्हा लिपीक यांना दूरध्वनी करुन कळविण्यात यावे.